<u>आस्थापना विभाग</u>

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## दि. ३१ / १० /2025

## (गोषवारा)

प्रकरण क्र. :- २०८ मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध मालमत्तेच्या संरक्षणार्थ महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडून पुरवठा करण्यात येत असलेल्या पुरुष व महिला सुरक्षारक्षक प्रती दि.15/09/2025 ते दि.14/09/2026 या कालावधीकरीता मुदतवाढ देणेबाबत (E-557817)

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध मालमत्तेच्या संरक्षणार्थ मा.प्रशासक तथा आयुक्त यांनी प्रशासकीय सभा दि.04/10/2024, प्रशासकीय ठराव क्र.208 अन्वये महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचे समवेत दि.15/09/2024 पासून ते दि.14/09/2025 पर्यंत एकुण 01 वर्षाकरीता एकूण 422 सुरक्षारक्षक पुरवठा करणेकरिता करारनामा करून दि.29/04/2025 रोजी कार्यादेश देण्यात आला आहे. त्यानुसार सद्यस्थितीत एकूण 422 सुरक्षारक्षक कार्यरत आहेत.

| अ.क्र. | विभाग | कार्यरत सुरक्षारक्षक संख्या |
|---|---|---|
| 1. | उद्यान विभाग | 102 |
| 2. | शिक्षण विभाग | 75 |
| 3. | मनपा मुख्यालय, मनपाच्या मालमत्ता, प्रभाग कार्यालय क्र.01 ते 06 व ईतर ठिकाणी | 245 |
| | एकुण | 422 |

महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडील सुरक्षारक्षक महानगरपालिकेच्या विविध विभागात कार्यरत असून सदर सुरक्षारक्षकांची प्रशासनाला आवश्यकता आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध मालमत्तेच्या संरक्षणार्थ पुरवठा करण्यात येणाऱ्या सुरक्षारक्षकांकरीता अंदाजित मासिक रु.1,05,00,000/- इतका व वार्षिक रु.14,17,92,000/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर कामी सन 2025-26 या आर्थिक वर्षातील "सुरक्षा व्यवस्था खर्च" या लेखशिर्षाखाली तरतुद रु.1000.00 लक्ष एवढी तरतुद करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडील सुरक्षारक्षक महानगरपालिकेत घेणेबाबत महाराष्ट्र शासन राजपत्रात दि.19/04/2010 रोजी अधिसूचना प्रसिद्ध असून त्यामधील अनु.क्र.15.(1) मध्ये पुढीलप्रमाणे नमुद आहे: "राज्य शासनाची कार्यालये, संघटना आणि राज्य शासनाचे सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम यांना महामंडळाकडून सुरक्षा घेणे अनिवार्य असेल". यावरुन महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडून महानगरपालिकेने सुरक्षारक्षक नेमणूक करणे बंधनकारक आहे.

त्यानुसार महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडून दि.15/06/2021 रोजी पासून मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध मालमत्तेच्या संरक्षणार्थ सुरक्षारक्षकांचा पुरवठा

करण्यात येत आहे. या कामकाजाकरिता वेळोवेळी 01 वर्षाकरिता मुदतवाढ देण्यात येत असून त्याप्रमाणे करारनामा सुध्दा करण्यात आलेला आहे.

सद्यस्थितीतील दि.15/09/2024 ते दि.14/09/2025 या कालावधीकरिता करण्यात आलेला करारनामा संपुष्टात आल्याने मागील वर्षाप्रमाणे देण्यात आलेल्या मुदतवाढीनुसार दि.15/09/2025 ते दि.14/09/2026 या कालावधीकरिता एकुण 422 सुरक्षारक्षकांकरीता मुदतवाढ देणेस तसेच त्यांच्या वेतनाकरीता वार्षिक रु.14,17,92,000/- इतक्या येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

(सचिन बांगर)
उप-आयुक्त (सुरक्षा)
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

प्रशासकीय
मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि. 30/10/2025 वेळ 11.30 वा
रजिस्टर नोंद अ. क्र. 288 वर्ष 2025-26

लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

\\deepal\D\SAMEER SIR\MSF मुदतवाढ\प्रशासकीय गोषवारा.doc

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## आस्थापना विभाग

दि. ३१ / १० /2025

प्रकरण क्र. :- २७८ मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध मालमत्तेच्या संरक्षणार्थ महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडून पुरवठा करण्यात येत असलेल्या पुरुष व महिला सुरक्षारक्षक प्रती दि.15/09/2025 ते दि.14/09/2026 या कालावधीकरीता मुदतवाढ देणेबाबत

ठराव क्र. :- २७८

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध मालमत्तेच्या संरक्षणार्थ मा.प्रशासक तथा आयुक्त यांनी प्रशासकीय सभा दि.04/10/2024, प्रशासकीय ठराव क्र.208 अन्वये महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचे समवेत दि.15/09/2024 पासून ते दि.14/09/2025 पर्यंत एकुण 01 वर्षाकरीता एकूण 422 सुरक्षारक्षक पुरवठा करणेकरिता करारनामा करून दि.29/04/2025 रोजी कार्यादेश देण्यात आला आहे. त्यानुसार सद्यस्थितीत एकूण 422 सुरक्षारक्षक कार्यरत आहेत.

| अ.क्र. | विभाग | कार्यरत सुरक्षारक्षक संख्या |
|---|---|---|
| 1. | उद्यान विभाग | 102 |
| 2. | शिक्षण विभाग | 75 |
| 3. | मनपा मुख्यालय, मनपाच्या मालमत्ता, प्रभाग कार्यालय क्र.01 ते 06 व ईतर ठिकाणी | 245 |
| | एकुण | 422 |

महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडील सुरक्षारक्षक महानगरपालिकेच्या विविध विभागात कार्यरत असून सदर सुरक्षारक्षकांची प्रशासनाला आवश्यकता आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध मालमत्तेच्या संरक्षणार्थ पुरवठा करण्यात येणाऱ्या सुरक्षारक्षकांकरीता अंदाजित मासिक रु.1,05,00,000/- इतका व वार्षिक रु.14,17,92,000/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर कामी सन 2025-26 या आर्थिक वर्षातील "सुरक्षा व्यवस्था खर्च" या लेखशिर्षाखाली तरतुद रु.1000.00 लक्ष एवढी तरतुद करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडील सुरक्षारक्षक महानगरपालिकेत घेणेबाबत महाराष्ट्र शासन राजपत्रात दि.19/04/2010 रोजी अधिसूचना प्रसिद्ध असून त्यामधील अनु.क्र.15.(1) मध्ये पुढीलप्रमाणे नमुद आहे: "राज्य शासनाची कार्यालये, संघटना आणि राज्य शासनाचे सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम यांना महामंडळाकडून सुरक्षा घेणे अनिवार्य असेल". यावरुन महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडून महानगरपालिकेने सुरक्षारक्षक नेमणूक करणे बंधनकारक आहे.

त्यानुसार महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडून दि.15/06/2021 रोजी पासून मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध मालमत्तेच्या संरक्षणार्थ सुरक्षारक्षकांचा पुरवठा करण्यात येत आहे. या कामकाजाकरिता वेळोवेळी 01 वर्षाकरिता मुदतवाढ देण्यात येत असून त्याप्रमाणे करारनामा सुध्दा करण्यात आलेला आहे.

सद्यस्थितीतील दि.15/09/2024 ते दि.14/09/2025 या कालावधीकरिता करण्यात आलेला करारनामा संपुष्टात आल्याने मागील वर्षाप्रमाणे देण्यात आलेल्या मुदतवाढीनुसार दि.15/09/2025 ते दि.14/09/2026 या कालावधीकरिता एकुण 422 सुरक्षारक्षकांकरीता मुदतवाढ देणेस तसेच त्यांच्या वेतनाकरीता वार्षिक रु.14,17,92,000/- इतक्या येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे. पारित ठरावानुसार संबंधित विभागाने नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित करावी.

(दिनेश कैलास कानगुडे)
महापालिका सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(राधाबिनोद अ. शर्मा, भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :- आस्थापना विभागाकडे योग्य त्या कार्यवाही करीता सादर.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## // पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग //

// गोषवारा //

दि. ३१/१०/२०२५

**प्रकरण क्र** ( २७८ ) :- मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुककामी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणेकरीता पिण्याच्या पाण्याची बॉटल (500 मि.ली., 1 लिटर व 20 लिटर बॉटल नळ असलेले जार ) पुरवठा करणे कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत. (E 2538507)

दि.29/09/2025 रोजी मा. स्थायी समिती सभागृह येथे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकपुर्व तयारी बाबत मा. अति. आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर आढावा बैठकीमध्ये मा. अति. आयुक्त यांनी पाणी पुरवठा विभागामार्फत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याकरीता निर्देश दिलेले आहेत.

सार्वत्रिक निवडणुककामी निवडणुक निर्णय अधिकारी कार्यालय, सहा. निवडणुक निर्णय अधिकारी कार्यालय, प्रशिक्षणासाठी येणाऱ्या कर्मचाऱ्यांना तसेच प्रत्यक्ष निवडणुकीच्या आदल्या दिवशी व निवडणुकीच्या दिवशी मतदान केंद्रांवर (अंदाजे 1200 ते 1300 मतदान केंद्रे) पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याकरीता पिण्याच्या पाण्याच्या बॉटल (500 मि.ली., 1 लिटर व 20 लिटर बॉटल नळ असलेले जार) चे दर निश्चित करणे गरजेचे आहेत. याकरीता पिण्याच्या पाणी बॉटल (500 मि.ली., 1 लिटर व 20 लिटर बॉटल नळ असलेले जार) करीता होणाऱ्या अंदाजित रु.25 लक्ष इतक्या रक्कमेची निविदा मागवून दर निश्चित करणे व होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेचा गोषवारा मा. प्रशासकापुढे ठेवणेस शिफारस आहे.

(दिपक खांबित)
**शहर अभियंता**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**मा.आयुक्त यांच्या मान्यतेने**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## // पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग //

प्रशासकीय ठराव दिनांक ३१ / १० /२०२५

**प्रकरण क्र.** ( २७९ ) :- मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुककामी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणेकरीता पिण्याच्या पाण्याची बॉटल (500 मि.ली., 1 लिटर व 20 लिटर बॉटल नळ असलेले जार ) पुरवठा करणे कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत. (E 2538507)

**ठराव क्र.** ( २७९ )

दि.29/09/2025 रोजी मा. स्थायी समिती सभागृह येथे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकपुर्व तयारी बाबत मा. अति. आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर आढावा बैठकीमध्ये मा. अति. आयुक्त यांनी पाणी पुरवठा विभागामार्फत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याकरीता निर्देश दिलेले आहेत.

सार्वत्रिक निवडणुककामी निवडणुक निर्णय अधिकारी कार्यालय, सहा. निवडणुक निर्णय अधिकारी कार्यालय, प्रशिक्षणासाठी येणाऱ्या कर्मचाऱ्यांना तसेच प्रत्यक्ष निवडणुकीच्या आदल्या दिवशी व निवडणुकीच्या दिवशी मतदान केंद्रांवर (अंदाजे 1200 ते 1300 मतदान केंद्रे) पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याकरीता पिण्याच्या पाण्याच्या बॉटल ( 500 मि.ली., 1 लिटर व 20 लिटर बॉटल नळ असलेले जार) चे दर निश्चित करणे गरजेचे आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी वे विशेषत: कलम 452 (अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारनुसार मी, राधाबिनोद अरिबम शर्मा, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याकरीता पिण्याच्या पाण्याच्या बॉटल (500 मि.ली., 1 लिटर व 20 लिटर बॉटल नळ असलेले जार) करीता होणाऱ्या अंदाजित रु.25 लक्ष इतक्या रक्कमेची निविदा मागवून दर निश्चित करणे व होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

वरील पारित ठरावानुसार पाणी पुरवठा व मलनिसारण विभागाने नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

(दिनेश कैलास कानगुडे)
महापालिका सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(राधाबिनोद अ. शर्मा) भाप्रसे
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईदर महानगरपालिका

C:\Users\HP\Downloads\Water Bottle - Election.Doc

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# पशूसंवर्धन विभाग
## प्रशासकीय गोषवारा दि.३१/१०/२०२५

**प्रकरण क्रमांक :- (२८०) आजारी पशुपक्ष्यांवर प्राथमिक उपचारासाठी एक "पशुवैद्यक" ठोक मानधनावर नेमण्याबाबत.** (ई-2462534)

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पशुसंवर्धन विभागासाठी पुनम सागर, अय्यपा मंदीराजवळ मिरा रोड (पुर्व) येथे आजारी पशुपक्ष्यांवर प्राथमिक उपचार व नागरिकांच्या तक्रारीनुसार प्रत्यक्ष जागेवर जावुन पशुरुग्णवाहिकेव्दारे उपचार करणेसाठी ठोक मानधनावर "पशुवैद्यक" हे पद भरती करणेकरिता मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने दि.03/05/2023 रोजी जाहीर सुचना प्रसिध्दी करुन थेट मुलाखतीव्दारे (walk in selection) दि. 30/05/20203 रोजीच्या मा. उप-आयुक्त सो(मु.) यांच्या आदेशानुसार नियुक्ती नुसार "पशुवैद्यक" पद रु.50,000/- ठोक मानधनावर भरण्यात आले होते. दि. 21/03/2025 रोजीचा नविकरणाचा प्रशासकीय ठराव क्र.460 करण्यात आला होता. **डॉ. शितल भोये "पशुवैद्यक"** या सदर कामासाठी कार्यरत होत्या.

**डॉ. शितल भोये** पशुवैद्यक यांनी दि.03/09/2025 रोजीचे नोकरी सोडण्याबाबतचे पत्र, प्राप्त दि. 08/09/2025 रोजी एक महिना अगोदर सुचीत करुन राजीनामा दिला असल्याकारणाने पुनम सागर, अय्यपा मंदीराजवळ पशु उपचार केंद्र मिरा रोड (पु.) येथील वाढत्या तक्रारी बघता व मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील व शहरापासुन दुरस्थ ठिकाणी असणारे तसेच निर्बिजीकरण केंद्रापासुन दुर असलेल्या भागात असणारे भटक्या प्राण्यांकरिता सध्यस्थितीत यंत्रणा कार्यरत राहण्यासाठी तात्काळ "पशुवैद्यक" पद ठोक मानधनावर भरणे गरजेचे आहे.

**पशुवैद्यक (ठोक मानधन) यांची शैक्षणिक पात्रता/अर्हता–**

| अ.क्र. | पदनाम | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|
| 1. | पशुवैद्यक | 1) B.V.Sc & A.H<br>2) MSVC यांचे नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक |

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर सुधारीत आकृतीबंधानुसार पशुवैद्यकीय विभागासाठी "पशुवैद्यकीय अधिकारी "हे एक पद 7 व्या वेतन आयोगानुसार S-20 या वेतनश्रेणीत मंजुर आहे.

| BASIC | DA (55%) | HRA(30%) | TRAV ALL | LOC ALL | TOTAL |
|---|---|---|---|---|---|
| 56100 | 30885 | 16830 | 5400 | 300 | 109485 |

सदर वरील पदासाठी एकत्रित वेतन 1,09,485/- इतके आहे. शासन निर्णय, क्रंमाक-पदनि-2022/प्र.क्र.15/आ.पु.क, दिनांक-27 एप्रिल 2022 नुसार शासनावरील खर्च आटोक्यात ठेऊन विकास कामांसाठी पुरेसा निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शक्य असेल तेथे नवीन पदनिर्मिती न करता सदरची कामे बाहययंत्रनेकडुन करुन घेण्यात यावी, असे सुचीत केलेले आहे. बाहययंत्रनेकडुन कामे करुन घेताना, जर अशी कामे नियमितपणे पदनिर्मिती करुन केली असता जितका खर्च आला असता, त्या खर्चाच्या कमीत कमी 20 ते 30 टक्के इतकी बचत होईल. अशा रितीने करुन घ्यावीत. सदर बचतीची नोंद प्रशासकीय विभागांनी सोबत जोडलेल्या प्रपत्रामध्ये ठेवणे आवश्यक आहे.

नवि-मुंबई महानगरपालिका येथे पशुवैद्यक पदासाठी ठोक मानधनावर रु. 1.00 लाख इतके मानधन मंजुर आहे. पनवेल महानगरपालिकेत प्रशासकीय ठरावाच्या मंजुरीने, "पशुवैद्यक" पदासाठी रु. 80,000/- ठोक मानधनावर "पशुवैद्यक" यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

सदरहु बघता मिरा भाईंदर कार्यक्षेत्रातील एक "पशुवैद्यक" पदासाठी ठोक मानधनावर नियुक्ती करणेकरीता जाहिरात प्रसिध्द करणेस तसेच यापुर्वी पशुवैद्यकीय अधिकारी या पदास मासिक रु.60000/- मानधन देण्यात येत होते. शासन निर्णय, क्रंमाक-पदनि-2022/प्र.क्र.15/आ.पु.क, दिनांक-27 एप्रिल 2022 नुसार एकत्रित मासिकवेतन रु. 1,09,485/- इतके लागु आहेत.

उपरोक्त शासन निर्णय नुसार 30% शासन बचत वजा जाता रू. 76000/- (सर्व समावेशक ) मानधनावर या पुर्वी नेमण्यात आलेल्या पशुवैद्यकीय अधिकारी या पदाकरीता व नव्याने नेमावयाच्या "पशुवैद्यक" या पदाकरिता मानधनावर नियुक्ती करणेकरीता या विभागाची शिफारस आहे.

**(डॉ. सचिन बांगर)**
**उप- आयुक्त (पशुसंवर्धन)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. आयुक्तांच्या मान्यतेने**

प्रशासकीय
**मा. महासभा / स्थायी समिती सभा**
गोषवारा प्राप्त दि. 30/10/2025 वेळ ४.४० pm
रजिस्टर नोंद अ. क्र. २e9 वर्ष २०२५-२६

लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## पशुसंवर्धन विभाग
## दि.31/10/2025

**प्रकरण क्रमांक :- (259)** **आजारी पशुपक्ष्यांवर प्राथमिक उपचारासाठी एक "पशुवैद्यक" ठोक मानधनावर नेमण्याबाबत.(ई-2462534)**

**ठराव क्र. :- (250)**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पशुसंवर्धन विभागासाठी पुनम सागर, अय्यपा मंदीराजवळ मिरा रोड (पुर्व) येथे आजारी पशुपक्ष्यांवर प्राथमिक उपचार व नागरिकांच्या तक्रारीनुसार प्रत्यक्ष जागेवर जावुन पशुरुग्णवाहिकेव्दारे उपचार करणेसाठी ठोक मानधनावर "पशुवैद्यक" हे पद भरती करणेकरिता मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने दि.03/05/2023 रोजी जाहीर सुचना प्रसिध्दी करुन थेट मुलाखतीव्दारे (walk in selection) दि. 30/05/20203 रोजीच्या मा. उप-आयुक्त सो(मु.) यांच्या आदेशानुसार नियुक्ती नुसार "पशुवैद्यक" पद रु.50,000/- ठोक मानधनावर भरण्यात आले होते. दि. 21/03/2025 रोजीचा नविकरणाचा प्रशासकीय ठराव क्र.460 करण्यात आला होता. **डॉ. शितल भोये "पशुवैद्यक"** या सदर कामासाठी कार्यरत होत्या.

**डॉ. शितल भोये** पशुवैद्यक यांनी दि.03/09/2025 रोजीचे नोकरी सोडण्याबाबतचे पत्र, प्राप्त दि. 08/09/2025 रोजी एक महिना अगोदर सुचीत करुन राजीनामा दिला असल्याकारणाने पुनम सागर, अय्यपा मंदीराजवळ पशु उपचार केंद्र मिरा रोड (पु.) येथील वाढत्या तक्रारी बघता व मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील व शहरापासुन दुरस्थ ठिकाणी असणारे तसेच निर्बिजीकरण केंद्रापासुन दुर असलेल्या भागात असणारे भटक्या प्राण्यांकरिता सध्यस्थितीत यंत्रणा कार्यरत राहण्यासाठी तात्काळ "पशुवैद्यक" पद ठोक मानधनावर भरणे गरजेचे आहे.

**पशुवैद्यक (ठोक मानधन) यांची शैक्षणिक पात्रता/अर्हता–**

| अ.क्र. | पदनाम | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|
| 1. | पशुवैद्यक | 3) B.V.Sc & A.H<br>4) MSVC यांचे नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक |

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर सुधारीत आकृतीबंधानुसार पशुवैद्यकीय विभागासाठी "पशुवैद्यकीय अधिकारी "हे एक पद 7 व्या वेतन आयोगानुसार S-20 या वेतनश्रेणीत मंजुर आहे.

| BASIC | DA (55%) | HRA(30%) | TRAV ALL | LOC ALL | TOTAL |
|---|---|---|---|---|---|
| 56100 | 30885 | 16830 | 5400 | 300 | 109485 |

सदर वरील पदासाठी एकत्रित वेतन 1,09,485/- इतके आहे. शासन निर्णय, क्रंमाक-पदनि-2022/प्र.क्र.15/आ.पु.क, दिनांक-27 एप्रिल 2022 नुसार शासनावरील खर्च आटोक्यात ठेऊन विकास कामांसाठी पुरेसा निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शक्य असेल तेथे नवीन पदनिर्मिती न करता सदरची कामे बाहययंत्रनेकडुन करुन घेण्यात यावी, असे सुचीत केलेले आहे. बाहययंत्रनेकडुन कामे करुन घेताना, जर अशी कामे नियमितपणे पदनिर्मिती करुन केली असता जितका खर्च आला असता, त्या खर्चाच्या कमीत कमी 20 ते 30 टक्के इतकी बचत होईल. अशा रितीने करुन घ्यावीत. सदर बचतीची नोंद प्रशासकीय विभागांनी सोबत जोडलेल्या प्रपत्रामध्ये ठेवणे आवश्यक आहे.

नवि-मुंबई महानगरपालिका येथे पशुवैद्यक पदासाठी ठोक मानधनावर रु. 1.00 लाख इतके मानधन मंजुर आहे. पनवेल महानगरपालिकेत प्रशासकीय ठरावाच्या मंजुरीने, "पशुवैद्यक" पदासाठी रु. 80,000/- ठोक मानधनावर "पशुवैद्यक" यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

सदरहु बघता मिरा भाईंदर कार्यक्षेत्रातील एक "पशुवैद्यक" पदासाठी ठोक मानधनावर नियुक्ती करणेकरीता जाहिरात प्रसिध्द करणेस तसेच यापुर्वी पशुवैद्यकीय अधिकारी या पदास मासिक रु.60000/- मानधन देण्यात येत होते. शासन निर्णय, क्रंमाक-पदनि-2022/प्र.क्र.15/आ.पु.क, दिनांक-27 एप्रिल 2022 नुसार एकत्रित मासिकवेतन रु. 1,09,485/- इतके लागु आहेत.

उपरोक्त शासन निर्णय नुसार 30% शासन बचत वजा जाता रू. 76000/- (सर्व समावेशक ) मानधनावर या पुर्वी नेमण्यात आलेल्या पशुवैद्यकीय अधिकारी या पदाकरीता व नव्याने नेमावयाच्या "पशुवैद्यक" या पदाकरिता नियुक्ती करणेस मान्यता देण्यात येत आहे. पारित ठरावानुसार संबंधित विभागाने नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित करावी.

(दिनेश कैलास कानगुडे)
महापालिका सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(राधाबिनोद अरिबम शर्मा भा.प्र.से )
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा.प्रशासकीय सभा दि.३१/१०/2025**

**// गोषवारा //**

प्रकरण क्र.(२८९) मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक 2025 करिता बसेस पुरवठा करणेकामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेबाबत. E2535537

मिरा भाईंदर महानगरपालिकेकरीता सार्वत्रिक निवडणूक 2025-2026 करिता मतदान केंद्रावर ने-आण करण्यासाठी 20 आसनाच्या, 30 आसनाच्या, 40 आसनाच्या, 50 आसनाच्या बसेस पुरवठा करावी लागणार आहेत.

सदरकामी अंदाजे रु.50,00,000/- (अक्षरी - पन्नास लाख रुपये) इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च सन 2025-26 करीता उपलब्ध निवडणूक विभागाच्या महसूली खर्च लेखाशीर्ष "मनपा सार्वत्रिक निवडणूक "या लेखाशिर्षामधील रु.14.00 कोटी तरतूदीमधून करण्याचा प्रस्ताव विभागामार्फत सादर करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि १४, दि. 26/08/2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतूद व विशेषतः कलम ४५२ अ चा (१ अ) व (1 ब) मधील तरतूदीनुसार मा. आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असून त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झालेले आहेत. सदर प्राप्त अधिकारात वरील नमुद प्रस्तावास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेस शिफारस आहे.

**(मा.आयुक्त सो. यांच्या मान्यतेने)**

डॉ.सचिन बांगर
उपायुक्त (वाहन)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## वाहन व यांत्रिकी विभाग

**मा.प्रशासकीय सभा दि.३१/१०/2025**

## // ठराव //

प्रकरण क्र. (२८९) :- मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक 2025 करिता बसेस पुरवठा करणेकामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

ठराव क्र. (२८९) :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेकरीता सार्वत्रिक निवडणूक 2025-2026 करिता मतदान केंद्रावर ने-आण करण्यासाठी 20 आसनाच्या, 30 आसनाच्या, 40 आसनाच्या, 50 आसनाच्या बसेस पुरवठा करावी लागणार आहेत.

सदरकामी अंदाजे रु.50,00,000/- (अक्षरी - पन्नास लाख रुपये) इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च सन 2025-26 करीता उपलब्ध निवडणूक विभागाच्या महसूली खर्च लेखाशीर्ष "मनपा सार्वत्रिक निवडणूक "या लेखाशिर्षामधील रु.14.00 कोटी तरतूदीमधून करण्याचा प्रस्ताव विभागामार्फत सादर करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि १४, दि. 26/08/2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतूद व विशेषतः कलम ४५२ अ चा (१ अ) व (1 ब) मधील तरतूदीनुसार मा. आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असून त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झालेले आहेत. सदर अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन वरील कामाच्या अंदापत्रकीय खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.

पुढील आवश्यक कार्यवाही नियमानुसार वाहन व यांत्रिकी विभागाने विहीत पद्धतीने करावी.

(दिनेश कैलास कानगुडे)
महापालिका सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(राधाबिनोद अ. शर्मा, भा.प्र.से)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका